# रेणू एक अनोखा जीवनसंग्राम - भाग २

नंतर काही दिवसांनी तिला पोस्टाने पार्सल आले. पार्सल इंडियाहून आले होते. तिने ते उघडले. तर जयंतने तिच्यासाठी डिव्होर्स पेपर्स पाठवले होते. सोबत एक पत्र होते. त्यात म्हटले होते, तिला भारतात परतणे शक्य होत नाही असे दिसते, त्यामुळे त्याने श्रीधर व स्वतःसाठी श्रीधरच्या शाळेतल्या शिक्षिका सुशीला हिच्याशी विवाह करायचा ठरवले आहे. तेव्हा डिव्होर्स पेपरवर सही करून उलट टपाली पाठवल्यास पुढची कामे सुलभ होतील. तिला वाटले तरीच जयंत हल्ली माझ्याशी बोलण्यास इच्छुक नसायचा. तिला खूप वाईट वाटले. पण तिने लगेच सैंड करून उलट टपाली ते पेपर्स पाठवून दिले. हे नाते तुटले. आता जगात आपल्या नात्याचे कोणी नाही. मुलगा असूनही तोही आता परकाच  होणार. इथली शाळेत जाणारी मुले बघून तिला नेहमी वाटे, जयंत इथे आला तर आपला श्रीधर असाच येथे शाळेत जाईल. स्मार्ट होईल. तिची स्वप्ने स्वप्नेच राहिली. तिचे दु:ख तिलाच पचवायला पाहिजे. तिच्या आपले कोणीच नव्हते. जयंतचा हा बेत आधी समजला असता तर कदाचित तिने विल्यमला हो म्हटले असते का? असे तिच्या मनात आले. पण छे! तिच्या मनाचा कौल होकारार्थी नाही आला. आपल्या मनाचा हळुवार कोपरा असा कापून टाकता येतो का? तिचे तिच्या पतीवरचे एकनिष्ठ प्रेम मनाच्या कोपऱ्यात सुरक्षित होते. जयंतला तिच्याबद्दल तशी तीव्र भावना नव्हती का? त्यांचे प्रेम त्यावेळपुरते, वरवरच होते का? तिच्या मनात त्यांच्या एकत्रित सहजीवनाचे, प्रेमाचे अनेक प्रसंग गोल गोल फिरत होते. थोडे दिवस तिला या सर्वांचा खूप त्रास झाला, पण तिने तिच्या भावना मनाच्या कोपऱ्यात बंदिस्त करून ती रोजच्या जीवनाला सामोरी ठाकली.

तिने आता आजूबाजूला मैत्रिणी जोडल्या. त्यात तिला स्वाती आणि तिचा पती स्वानंद हे जोडपे अतिशय भावले. दोघेही मोकळ्या स्वभावाचे, तिच्यापेक्षा  लहान होते, पण प्रत्येक कार्यक्रमात तिला सहभागी करून घ्यायचे. स्वातीला आई नव्हती. बहीण भारतात कुठेतरी आडगावी राहायची. त्यामुळे तिला रेणूच्या रूपाने मोठी बहीण मिळाल्यासारखे वाटले. स्वानंदची फॅमिली मुंबईची. त्याचे आई-वडील कधी तरी इथे येऊन जात. त्यांचा हा एकटाच मुलगा. स्वानंद-स्वातीला पहिला मुलगा झाला, तेव्हा ते चार महिन्यासाठी आले होते. मुलाचे नाव सर्वानुमते संचय असे ठेवले. त्यानंतर तीन वर्षांनी मुलगी झाली. तिचे नाव स्वातीने समिधा असे ठेवले. तिच्या वेळी प्रकृती अस्वास्थ्यामुळे कोणी येऊ शकले नाही. दोन्ही मुले गोड होती. त्यांनी रेणूबरोबर मावशीचे नाते जोडले होते. दिवाळी, ख्रिसमस, थँक्सगिव्हिंग या सणांना आता ती या सर्वांबरोबर व त्यांच्या मित्रपरिवाराबरोबर मिसळून साजरे करू लागली. भारतात कधीतरी ती आईंना (सासूबाईंना) फोन करीत असे. श्रीधरची चौकशी करीत असे. बाकी सर्व धागे तिने बांधून कोपऱ्यात टाकले होते. तिचा शेतकरी भाऊ रॉड्रिक तर तिला दर वीकेंडला आपल्याकडे बोलवायचा. त्याची पत्नी एली तर या नणंदेवर खुष होती. रेणूने आपले

कुटुंब असेच वाढवायचे ठरवले. तिची घरमालकीण तेरेना तर तिची आँटीच झाली होती. रेणू नेहमी तिला भारतीय पदार्थ करून द्यायची. तिची काळजी घ्यायची. तिची बाहेरची कामे करून घ्यायची. रेणूच्या नवऱ्याने घटस्फोट देऊन दुसरे लग्न केले ह्याचा तेरेनाला भयंकर राग आला. ती हिला परत परत सांगत होती, “तू पण दुसरे लग्न कर. विल्यमने अजून लग्न केले नसेल तर त्याला हो म्हण. मी त्याला विचारू का”, असे पण म्हणाली. पण रेणू म्हणाली, “मला त्यात काही इंटरेस्ट नाही. मला कोणी खरेच तसा भेटला तर मी तुला नक्की सांगेन." तेरेनाला रेणुचा खूप लळा लागला होता. तिला रेणूचा  आधार वाटायचा. तिने रेणूला घर अगदी माफक भावात विकले. स्वतःचे घरही आपल्या मृत्यूनंतर एका ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेणाऱ्या संस्थेला आपल्या मृत्यूनंतर मिळावे, असे मृत्युपत्र करून आपल्या वकिलांकडे दिले व आपण संस्थेच्या वृद्धाश्रमात राहायला गेली.  रेणूने तिला आपल्याकडे  राहायला ये, असा खूप आग्रह केला. पण ती म्हणाली, “माझ्या वयाच्या माणसांत मी जास्त कम्फर्टेबल असेन”. रेणू तिला नियमित भेटत असे.

एक दिवस स्वानंद ऑफिसमधून येताना एका मद्यधुंद ड्रायव्हरने त्याच्या गाडीवर ट्रक घातला. स्वानंद जागच्या जागीच मृत पावला. त्या ड्रायव्हरला शिक्षा झाली. स्वातीला भरपाई म्हणून पैसे मिळाले. पण आपला माणूस जातो त्याची भरपाई होते का? त्याच्या आई-वडिलांना कळवले. त्यांचे दुःखही आभाळाएवढे होते. पण स्वाती त्यांना किंवा ते स्वातीला शांतवू शकले नाहीत. कारण ते इथे येऊ शकले नाहीत व स्वातीला भारतात जाणे शक्यच नव्हते. रेणूने स्वातीला व तिच्या मुलांना खूप आधार दिला. स्वातीला धीर देऊन परत उभे केले. दोन छोटी लेकरे तिच्यावर पूर्णतः अवलंबून होती. धाकटी तर फक्त दोन वर्षांची होती. स्वातीला स्वतःला सावरावेच लागले.

या सर्वात काळ पळतच होता. कधीकधी रेणुकाला वाटे, मी माझ्या कामाच्या वेडाने माझ्या कुटुंबाला सोडून येथे आले. ते चूक की बरोबर?  पण तिच्या मनातले तिच्या माणसांबद्दलचे प्रेम तसूभरही कमी झाले नव्हते. तिला त्यांच्यात परत जायचे होते. त्यांनी इथे यावे अशी तीव्र इच्छाही होती. त्यासाठी तिने दोन वेळा जयंत, श्रीधर व आई-बाबा यांच्यासाठी तिकिटे पाठवली, पण जयंतने शक्य नाही, रजा नाही अशा फुटकळ सबबी सांगून ती परत केली. त्याने आपले पासपोर्ट पण काढले नव्हते, हे तिला नंतर कळले. भौगोलिक अंतराने तिचे मन दुरावले नव्हते. पण त्याचे मात्र निश्चित दुरावले. नव्हे त्याने ते दुसरीकडे सहजपणे गुंतवले. स्वानंद-स्वातीच्या कुटुंबाकडे पाहतांना आता तिला वाटले, दुरावणे हे प्राक्तनच असते. कारण त्याप्रमाणे प्रसंग उद्भवतात. जीवनाच्या प्रवाहाची दिशा आपल्या हाती नसते. जसे समुद्रावरचे गलबत केवळ नावाड्याच्या इच्छेवर नाहीतर समुद्राच्या वाऱ्या-वादळावरही निर्भर असते. नावाड्याने फक्त सोयीस्कर वाट शोधून मार्ग काढायचा व मुक्कामात पोहोचायचे.

दोन वर्ष सुरळीत गेली. स्वाती पतीच्या अवचित मरण्याने आलेल्या प्राप्त परिस्थितीतून सावरते न सावरते, तोच आणखी एक दुर्दैवाचा घाला तिच्यावर पडला. स्वातीला कॅन्सरची लागण झाली होती व तोही लिव्हर कॅन्सर. आता तर मुलांचे भवितव्य नशिबाच्या अनिश्चित दावणीला बांधले गेले. स्वातीने औषध उपचार लगेच सुरू केले, पण डॉक्टरांच्या मते हा कॅन्सर बरा होण्यातला नव्हता. त्याच्या या रोगावरील औषध उपायांनी तिला फक्त एक दोन वर्षाचे आयुष्य ते देऊ शकत होते. आपले आयुष्य आता दोन वर्ष उरले आहे. एवढाच काळ आपल्या हाताशी आहे, असा विचार करून दगडाच्या काळजाने तिने मुलांच्या भवितव्यासाठी पुढचे निर्णय  घ्यायला सुरुवात केली. रेणूने तिला  पूर्ण साथ दिली. आपली सर्व मिळकत अगदी घरही विकून, त्याच्या एक ट्रस्ट केला. त्यावर ट्रस्टी म्हणून रेणुका व रीना या  दोघींना नेमले. रीना तिची मैत्रीण होती, पण एक सोशल वर्कर होती. अनाथ मुलांना, विस्थापित मुलांना फोस्टर पेरेंट्स (उसने पालक) मिळवून देऊन त्यांची व्यवस्था लावण्याचे काम ती फार आत्मीयतेने करीत असे. ती स्वतः बेपर्वा आई-वडिलांची विस्थापित मुलगी होती व अतिशय कष्टाने स्वतःचे आयुष्य, करियर तिने सांभाळले होते.  तेव्हा अशा मुलांच्या वेदना ती समजू शकत होती. त्यामुळे या कार्याला तिने वाहून घेतले होते. हे काम फार कष्टदायक व समाधान देईलच असे नव्हते. कारण पुष्कळदा पैशासाठी मुलांना आपल्या घरी ठेवायला हे पेरेंट्स तयार होत पण मुलांकडे नीट लक्ष देत नसत. मुले तिथून पळायला बघत. रीना हे काम सरकारतर्फे करते. त्यामुळे त्यांच्या अटी, बंधने पाळावी लागतात. त्यामुळे मुले व उसने पालक यांत तिला समझोते घडवून आणावे लागत. तरीसुद्धा अशी मुले स्वतःला असुरक्षित समजतात. कारण त्यांना एका फोस्टर पॅरेण्ट कडून दुसरा फोस्टर पॅरेण्टकडे जावे लागते. या टोलवाटोलवी मुळे आपण कोणालाच नको अशी त्यांची भावना होते. ती कायम अस्वस्थ असतात व त्यातूनच बरीच मुले गुन्हेगारीकडे वळतात व ड्रग ॲडिक्ट होतात. पुष्कळ मुलांना काळजी घेणारे पालक मिळून ते जीवनात यशस्वीही होतात. आपल्या मागे आपल्या मुलांचे काय होईल ही काळजी स्वातीला अस्वस्थ करत होती. पण रीना व रेणुका तिला धीर देत होत्या.

पहिल्यापासूनच रेणुकाला आपल्या कामात झोकून द्यायची सवय! तिला ते काम मनापासून प्रिय होते. त्यामुळे ऑफिसमध्ये तिच्यावर जबाबदारीची कामे सोपवली जात. पण हल्ली नवीन येणारी मुले काम सिरियसली घेत नसत. मायक्रोस्कोपमधून जास्तीत जास्त सूक्ष्मतम माहिती मिळेल, तेवढी शोधणे आवश्यक असते. कारण यावरच पुढचे महत्त्वाचे निर्णय अवलंबून असतात. पण या मुलांना प्रत्येक बाबतीत घाई. परत परत नेटाने माहिती गोळा करणे त्यांना कंटाळवाणे वाटे. शेवटी त्यांना रागावून फायदा नाही असे पाहून रेणू स्वतःच परत ते काम करी. या सर्व कामात एवढी गुंतून राहत गेली की तिला स्वतःचा विचार करायला वेळच नसे.

अचानक एक दिवस जयंतचा फोन आला. आईला बरे नाही. ती हॉस्पिटलमध्ये आहे. तिने तुझा ध्यास

घेतला आहे. रेणूने लगेच ऑफिसमध्ये पंधरा दिवसांची रजा टाकली. तिकीट बुक केले व दुसऱ्या दिवशी ती प्लेन पकडून मुंबईला रवाना झाली. जातानाच ड्यूटी फ्री शॉप मधून तिने श्रीधर व त्याच्या लहान बहिणीसाठी खेळणी (हो, जयंतला दुसरी मुलगी झाली होती.) तसेच त्यांच्या बायकोसाठी चांगले हिऱ्याचे सेट व जयंत आणि बाबांसाठी परफ्युम अशा वस्तू खरेदी केल्या. ती मुंबईला घरी पोचली तेव्हा बाबांनी दार उघडले. एवढ्या तत्परतेने आलेले बघून त्यांना खूप बरे वाटले. रेणूमध्ये काहीच फरक झालेला नव्हता. फक्त टी-शर्ट व जीन्स पॅन्ट! त्यांनी तिचे प्रेमाने स्वागत केले. जयंतची बायको सुशीला घरी होती. ती म्हणाली, "या ताई, सासूबाईंनी तुमचा ध्यास घेतला आहे. फ्रेश व्हा मग जेवण करू. त्यानंतर जरा विश्रांती घ्या. मग हॉस्पिटलमध्ये जाऊ". रेणूला तसा जेट लॅग वगैरे नव्हता. कारण तिने विमानात छान झोप काढली होती. त्यामुळे जेवल्यानंतर तासाभराने ती हॉस्पिटलला जायला निघाली. इथल्यासाठी तिने दोन तीन साड्या आणल्या होत्या. त्यामुळे साडी नेसूनच ती सुशीलाबरोबर हॉस्पिटलला गेली. त्या पोचल्या तेव्हा आई गाढ झोपल्या होत्या. नर्स म्हणाली, "आज खूप दिवसांनी त्या शांत झोपल्यात. त्यांची मुलगी येणार असे त्या सकाळी म्हणत होत्या. रेणूला मनात आश्चर्य वाटले. कारण ती फोन मिळाल्यावर इतकी झटपट आली की कामाच्या निपट्यात तिला 'येथे येत आहे' असे कळवायलाही वेळ नव्हता. कळवण्याची जरुरी पण वाटली नव्हती. मला कळल्यावर मी निश्चित येणार ही केवढी खात्री! केवढा माझ्यावर विश्वास! केवढे प्रेम! तिला मनोमन भरून आले. रेणू सुशीलाला म्हणाली, "श्रीधर, जयंत घरी येतील तेव्हा तुम्ही घरी जा. मी इथे बसते. संध्याकाळी बाबा आले की मी घरी येईन". सुशीलाने “बरे” म्हणून ती निघाली.

सुशीला घरी गेली व रेणू शांतपणे खुर्चीवर रेलली. तिला पूर्वीचे दिवस आठवले. तिच्या आई-वडिलांचे अपघाती निधन झाल्यावर सासुबाईने तिला आईच्या प्रेमाने परोपरीने सांभाळले. तिचे ऑफिसातले काम, त्याबद्दलची तिची तळमळ त्यांनी समजून घेतली. श्रीधरला पूर्णपणे त्यांनीच वाढवले. शिवाय तिला अमेरिकेची संशोधन शिष्यवृत्ती मिळाली, त्याचे त्यांना अपार कौतुक वाटले. जयंतची द्विधा मनस्थिती त्यांनी ओळखली. त्यांनी जयंतला सांगितले, "तुला जाता येत असेल, तर तू पण प्रयत्न कर. आमची काळजी करू नकोस. उलट आम्ही पण थोड्या दिवसांनी तिकडे येऊ. मलाही नवीन जग बघायची आवड आहे.” पण जयंतला त्याचे इथले आरामाचे सुखासीन संथ आयुष्यच आवडत होते. त्याला बदल नकोच होता. कसलीही जास्तीची धडपड नको होती. त्यामूळे तो तिथेच राहिला व सोयीस्कर म्हणून सुशीलाशी लग्न केले. त्यात त्याने स्वतःची व श्रीधरची सोय बघितली. पण आयुष्य फक्त सोयीवर चालते का? त्यात आत्मीयता, जिद्द, वेग असला तरच ते सर्वांगाने फुलते. स्वतःभोवती जाळे विणून राहणाऱ्या कोळ्याला फुलपाखराचे स्वच्छंदी उडणे कसे भावणार? रेणूच्या मनात स्मृतींचा कोलाहल चालू होता. एवढ्यात खोलीचे दार वाजले. तिने पटकन मान वर करून पाहिले तर जयंत आत येत होता. एकेकाळी तो तिचे सर्वस्व होता व अजूनही ती शरीर, मनाने त्याचीच राहिली होती. पण त्याच्याकडे दृष्टी टाकताच 'हा तो नव्हे' असे तिला जाणवले. तो मात्र

तिच्याकडे आसुसलेल्या नजरेने पहात म्हणाला, 'रेणू तू होती तशीच आहेस" व जवळ येऊन त्याने तिला कवेत घेतले. पण त्यात तिला आत्मीयतेचे पेक्षा, आपलेपणापेक्षा आधाशीपणा, परकेपणा जाणवला व ती चटकन बाजूला झाली व म्हणाली, "आई बऱ्याच वेळ झोपल्या आहेत, आता बहुतेक जाग्या होतील". त्यांच्या आवाजाने असेल किंवा झोप झाली असेल, म्हणून आईने डोळे उघडले. समोर रेणूला बघून हसल्या व म्हणाल्या, "आलीस ग पोरी, मला खात्री होती तू धावत येशील". तसे रेणू म्हणाली, "आई, आता पटकन बरे व्हायचे. मी इथेच तुमच्याकडे थांबणार आहे. मग त्या जयंतला म्हणाल्या, "मी तुला एक काम सांगितले होते, ते तू केलेस का?" जयंतने हो म्हणून बॅग उघडून त्यातून दोन बॉक्स काढून आईजवळ दिले. रेणूला ते बॉक्स बघून आठवले की ते तिच्या व तिच्या आईच्या दागिन्यांचे बॉक्स होते. ही गोष्ट एवढी वर्षे तिच्या ध्यानात पण नव्हती आणि तिला दागिन्यांची खास आवडही नव्हती. सासुबाई म्हणाल्या," या आजारपणातून बरी होऊन बाहेर पडेन असे वाटत नाही. मी तुझी अनामत तुला परत करत आहे. रेणू म्हणाली, "मला दागिने घालायला आवडत नाहीत आणि यांची मला जरूर नाही". तेव्हा सासुबाई म्हणाल्या, "तुझ्या आईची आठवण आहे ती तुझ्याजवळ ठेव. शेवटी रेणूने तिच्या आईचे दागिने व सासूबाईंनी तिच्या लग्नात तिला आवडीने कौतुकाने दिलेला चपलाहार एका बॉक्स मध्ये ठेवले व दुसऱ्या बॉक्समध्ये तिच्या लग्नातले व जयंतने प्रसंगानुसार दिलेले दागिने दुसऱ्या बॉक्समध्ये ठेवून तो जयंताकडे दिला व सांगितले, “हे सर्व श्रीधरच्या बायकोसाठी ठेवा”. मग त्याला म्हणाली, "घरी सुशिला वाट पाहत असेल, तर घरी जा आणि श्रीधर शाळेतून आला असेल, त्याला बाबांबरोबर येथे पाठवा. जयंत बाहेर पडला पण रेणूच्या सौंदर्याने व ताजेपणाने तो अस्वस्थ झाला होता. सुशीलाचे सामान्य रूप व स्थूलतेकडची वाटचाल व त्यामुळे गतीत येणारा थंडपणा त्याला आता फारच बोचला.

थोड्या वेळाने बाबा व श्रीधर आले. श्रीधरला पुसटशी आठवण होती. कारण रेणू अमेरिकेला गेली तेव्हा तो चार वर्षांचा होता. सुरुवातीला फोन यायचे तेव्हा तो लहान होता. आई म्हणून त्याच्याशी काय बोलावे, हे त्यावेळी समजत नव्हते. नंतर फोन आजी-आजोबा घ्यायचे. त्यामुळे त्याची आईशी ओळखच नव्हती, असे म्हटले तर वावगे ठरले नसते. परंतु तो मातृमुखी होता व आईचे अनेक चांगले गुण म्हणजे अभ्यासातली हुशारी, ध्येयाबद्दल चिकाटी त्याच्याकडे आले होते. आणि ही आपली आई आहे, हे त्याला जाणवले. तिने त्याला जवळ घेऊन कुरवाळले. डोक्यावरून, केसावरून प्रेमाने हात फिरवला. “आता तू नववीत ना?” असे म्हणून त्याच्या अभ्यासाची नीट चौकशी केली. त्याच्या यशाचे कौतुक करून म्हणाली, “पुढच्या वर्षी दहावीला उत्तम मार्क मिळवून नुसता पुस्तकी अभ्यास न करता सामान्यज्ञान, नवनवीन गोष्टी, संगणक यातही लक्ष घाल, नवनवीन ज्ञान मिळव. दहावी झालास की माझ्याकडे ये. मी तिथे असल्याने तुला जे शिकायचे असेल त्या शाखेचे शिक्षण घ्यायला प्रवेश मिळण्यास अडचण पडणार नाही. इथून बाहेर पडलास, जग बघितले की तुझ्यातला आत्मविश्वास वाढेल. तुझ्या बुद्धीची झेप तुला समजेल. तुझी प्रगती होईल आणि तुझ्या इच्छेप्रमाणे इथे किंवा

परदेशी कुठेही राहू शकशील. मात्र मेहनतीला पर्याय नाही, हे लक्षात ठेव. तू मला खूप प्रिय आहेस म्हणून तू माझ्यासाठी तिकडे यावेस असे मला वाटत नाही. तर तुझ्या प्रगतीसाठी, पुढच्या आव्हानात्मक भविष्यासाठी तू तिथे यावेस. फक्त मी तिथे असल्याने प्रवेश, खर्च, राहणे इत्यादी गोष्टींची काळजी तुला करण्याची गरज भासणार नाही". त्याला बघून तिला खूप बरे वाटले. दहा वर्षात दडवून ठेवलेली माया उफाळून वर आली. ते तिच्या अंगावर, चेहऱ्यावर रोमारोमात फुलून आलेली तिला जाणवली. तिच्या प्रेमळ स्पर्शातून त्याच्यात झिरपली. तो पण हसला. हळवा झाला व आई म्हणून तिला बिलगला. तेव्हा तिला स्वर्गच कवेत आल्यासारखे वाटले. बाबांनाही तो सोहळा हृदय हेलावणारा वाटला. आईला पण बरे वाटले. त्या दोघांनी श्रीधरला म्हटले, तुझी आई सांगते आहे, त्यांनी ध्यानात घे. खरेच बाळा उंच भरारी घे. तुझ्या पंखात भरपूर जोर येऊ दे. आमचे तुला आशीर्वाद आहेत. रेणुकाला आई-बाबांच्या प्रेमाबद्दल, हेतूबद्दल खात्री होती. ती त्यांच्यावरच आपल्या जिवाचा कलिजा सोपवून गेली होती. मग रेणूने बाबांना सांगितले, "मी इथे असे पर्यंत मीच आईकडे थांबीन. आता तुम्ही दोघे घरी जा". तिच्यासाठी हॉस्पिटलमध्ये आईजवळ थांबणे जास्त महत्त्वाचे होते. दहा दिवस ती तिथे होती. सकाळी घरी जाऊन आन्हिके उरकून ती हॉस्पिटलमध्ये येई व तिथे राही. पहिल्या दिवसानंतर तिची व जयंतची एकांतात भेट झालीच नाही. तिने ते सहजपणे टाळले. सर्वजण एकत्र असताना ते भेटले तेवढेच. तिने आणलेल्या भेटी सर्वांना आवडल्या. छोट्या त्रिषाला तर तिने आणलेली सर्व खेळणी आवडली व ही मावशी पण आवडली. ती घरी आली. कामावर रुजू झाली आणि आठवड्याभरात तिला फोन आला की सासुबाई गेल्या. ती त्यांना भेटून आली, तिला त्यांची थोडीफार सेवा करता आली या गोष्टीचे तिला समाधान वाटले. तिने मुंबईला फोन करुन सर्वांचे सांत्वन केले. श्रीधरला नियमित फोन करीन असे आश्वासन दिले. परत ती आपल्या कामात मग्न झाली.

(क्रमश:)

**© सौ. नलिनी करंडे**